**प्रेसनोट दि. २२.०२.२०२२**

लोकसेवक बाजीराव राजाराम पाटील वय ५२ वर्ष नायब तहसिलदार, अपर तहसिलदार कार्यालय आष्टा ता.वाळवा जि.सांगली रा.अशोकराज निवास, नवीन पोलीस ठाणे शिराळा शेजारी, शिराळा ता.शिराळा जि. सांगली व लोकसेवक सुधीर दिपक तमायचे वय ३७ वर्ष महसुल सहाय्यक, अपर तहसिलदार कार्यालय आष्टा ता.वाळवा जि.सांगली रा.शांतीनगर,इचलकरंजी ता.हातकणगले जि.कोल्हापूर यांचे विरूध्द लाच स्विकारलेबाबत कारवाई सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांनी त्यांचे जमीनीच्या सातबारा उतान्यावर राजपत्राप्रमाणे नावामध्ये बदल करून मिळणेबाबत अपर तहसिलदार कार्यालय आष्टा ता.वाळवा जि.सांगली या ठिकाणी अर्ज केला होता. तक्रारदार यांचे सातबारा उतान्यावर राजपत्राप्रमाणे नावामध्ये बदल करून देण्याचे कामामध्ये प्रकरण सही करून तहसिलदार यांचेकडे पाठवण्यासाठी नायबतहसिलदार पाटील व लिपीक तमायचे यांनी तक्रारदार यांचेकडे १०००/- रूपये लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.२१.०२.२०२२ रोजी दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि.२१.०२.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे लोकसेवक पाटील व लोकसेवक तमायचे यांची पंचा समक्ष पडताळणी केली असता पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक पाटील व लोकसेवक तमायचे यांनी तक्रारदार यांचेकडे १०००/- रूपये लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज रोजी लोकसेवक पाटील व लोकसेवक चमायचे यांचे विरूध्द अपरतहसिलदार कार्यालय आष्टा या ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक सुधीर दिपक तमायचे, महसुल सहाय्यक, अपर तहसिलदार कार्यालय आष्टा ता.वाळवा जि.सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेनंतर त्यांना पकडण्यात आले असून लोकसेवक बाजीराव राजाराम पाटील, नायब तहसिलदार, अपर तहसिलदार कार्यालय आष्टा ता.वाळवा जि.सांगली यांना त्यांचे कार्यालयामधून ताब्यात घेण्यात आले आहे.

लोकसेवक बाजीराव राजाराम पाटील वय ५२ वर्ष नायब तहसिलदार, अपर तहसिलदार कार्यालय आष्टा ता.वाळवा जि.सांगली रा.अशोकराज निवास, नवीन पोलीस ठाणे शिराळा शेजारी, शिराळा ता.शिराळा जि. सांगली व लोकसेवक सुधीर दिपक तमायचे वय ३७ वर्ष महसुल सहाय्यक, अपर तहसिलदार कार्यालय आष्टा ता.वाळवा जि.सांगली रा.शांतीनगर,इचलकरंजी ता.हातकणगले जि.कोल्हापूर यांचे विरुध्द आष्टा पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री सुहास नाडगौडा, श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, संजय संकपाळ, प्रितम चौगुले, धनंजय खाडे, सिमा माने, संजय कलगुटगी, भास्कर भोरे, सलिम मकानदार, रविंद्र धुमाळ, राधिका माने चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with CamScanner